**मुद्दा क्र.IIपदे राखून ठेवणे -**

मागासवर्गीयांसाठी पदे राखून ठेवण्याबाबतच्या विद्यमान आदेशांमध्ये सुधारणा करुन प्रत्येक रिक्त होणाऱ्या पदांमधील जी पदे थेट सेवाप्रवेशाद्वारे भरण्यात येतात त्या पदांपैकी पुढील टक्क्यांइतकी पदे मागासवर्गाच्या प्रत्येक गटातील खुल्या प्रवर्गातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावीत :-

| | | |
|---|---|---|
| [१] | अनुसूचित जाती आणि बौध्द धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जातीतील व्यक्ती | १३% |
| [२] | अनुसूचित जमाती [विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहाणाऱ्या अशा जमातींसह] | ७% |
| [३] | विमुक्त जाती - अ | ३% |
| [४] | भटक्या जमाती - ब | २.५% |
| [५] | भटक्या जमाती - क | ३.५% |
| [६] | भटक्या जमाती - ड | २% |
| [७] | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| [८] | इतर मागासवर्ग | १९% |
| [९] | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) | १६% |
| [१०] | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | १०% |
| | **एकूण** | **७८%** |

ही टक्केवारी मागासवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व्यक्तींच्या नियुक्तीद्वारे भरण्यात यावयाच्या रिक्त पदांची किमान टक्केवारी दर्शविते.

**मुद्दा क्र. VI**

**६.** सरळसेवा भरतीकरीता शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८/१६-बदि. ०५.१२.२०१८ व बीसीसी २०१९/प्र.क्र.११८ए/२०१९/१६-ब दि. १६.०२.२०१९ नुसार विहित केलेली १०० बिंदू नामावली सोबत जोडलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे वापरण्यात यावी.

४. हे आदेश दि. ०१.०२.२०१९ पासून अंमलात येतील.

५. सदर सुधारपत्र कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)
मुख्य महाव्यवस्थापक(मासं)(प्रभारी)

